

एम्को फाउंडेशनतर्फे आयोजित शिष्यवृत्ती वितरण प्रसंगी विद्यार्थिनी. सोबत मान्यवर.

# एम्को फाउंडेशनतर्फे शिष्यवृत्तीचे वितरण

**जळगाव :** एम्को फाउंडेशन द्वारा दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात आले. १७ रोजी हा उपक्रम पार पडला. महाराणा प्रताप विद्यालय, चौबे शाळा, विवेकानंद विद्यालय व केशवराव भोईटे शाळांमधील गुणवंत विद्यार्थ्यांना एम्को उद्योगातील अधिकारी रामास्वामी, श्रीकांत मिश्रा, विवेक बंगाली आणि मनपा संचलित रामलाल चौबे विद्यालयाच्या मुख्याध्यापिका प्रेमा वाणी यांच्या हस्ते शिष्यवृत्तीचे वितरण झाले. यावेळी पालक, शिक्षक आणि एम्कोतील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन नितू कुमार यांनी केले. एम्कोचे विजय वाघुळदे व सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.